# प्रेसनोट दि. १०/०४/२०२३

## आयपीएल क्रिकेट मॅचवर सट्टा घेणाऱ्यांना अटक

## खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांची कारवाई

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात आयपीएल क्रिकेट मॅचवर बेटींग जुगार चालविणाऱ्यांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अरविंद पवार यांनी खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना क्रिकेट मॅचवर बेटींग जुगार चालविणाऱ्यांची माहिती काढणेबाबत दिलेल्या सुचनेप्रमाणे खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार पिंपरी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस नाईक शैलेश मगर यांना मिळालेल्या बातमीवरुन, जय हिंद हॉन्डलुम दुकानाचे मागे, आंबेडकर कॉलनी, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे मागील रुममधुन इसम नामे १) नरेश जगन्नाथ अग्रवाल वय-४० वषे रा. जय हिंद हॉन्डलुम दुकानाचे मागे, आंबेडकर कॉलनी, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे २) विशाल राजु अग्रवाल, वय २४ वर्षे, रा. जय हिंद हॉन्डलुम दुकानाचे मागे, आंबेडकर कॉलनी, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे यांना ताब्यात घेवुन, त्यांचेकडुन क्रिकेट बेटींग करीता लागणारे एकुण किं.रू. ५२,१५५/- चे एकुण ०५ मोबाईल फोन, वही, डायरी व ०२ पेन इत्यादी साधने असा मुद्देमाल जप्त केला करुन त्यांचे विरुध्द **पिंपरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर ४११/२०२३ महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ व ५, इंडियन टेलीग्रॅम ॲक्ट कलम २५(क) अन्वये** गुन्हा दाखल केला आहे. नमुद आरोपीतांना पुढील कारवाईकामी पिंपरी पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास पिंपरी पोलीस स्टेशन हे करत आहे.

**सदरची कारवाई मा. विनय कुमार चौबे साो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.मनोज लोहीया, सह पोलीस आयुक्त, मा.डॉ. संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त, मा.स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.डॉ. प्रशांत अमृतकर, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे,यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार, सहा.पोलीस निरीक्षक उध्दव खाडे, सहा.पोलीस उप-निरीक्षक अशोक दुधवणे, अमर राऊत, पोलीस अंमलदार सुनिल कानगुडे, निशांत काळे, किरण काटकर, आशिष बोटके, शैलेश मगर, प्रदीप गुट्टे व तांत्रिक विश्लेषण विभागाचे पोहवा नागेश माळी यांनी केली आहे.**

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड